# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-३४ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २७ मार्च २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# दिवा शहराचा पाणी प्रश्न सुटणार!

## पाणी योजने अंतर्गत नव्या पाईपलाईनच्या वॉश आऊटचे काम सुरू

### सुमारे साडेचार किमी लांबीच्या पाईपलाईनचे वॉश आऊट

### महिना भरात वॉश आऊटचे काम पूर्ण होण्याची शक्यता

**दिवा न्यूज विशेष /एस.के.**

**दिवा:**–दिवा शहरातील पाणी प्रश्न सुटावा या दृष्टीने उपाययोजना करण्याचे काम पालिका प्रशासनाने हाती घेतले आहे.याच अंतर्गत नव्याने टाकण्यात आलेल्या नव्या मुख्य जलवाहिनीचे वॉश आऊट करण्याचे काम सध्या सुरू आहे. या कामाची पाहणी नुकतीच माजी उपमहापौर रमाकांत मढवी व पाणी पुरवठा अधिकारी वाघिरे यांनी केली.

दिवा शहरातील पाणीटंचाई लक्षात घेऊन ही समस्या निकालात काढण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत नव्याने पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात आले होते. या नव्या पाईपलाईन मधून पाणीपुरवठा सुरू करण्या आधी पाईपलाईन वॉश आऊट करण्याचे काम सध्या सुरू आहे.दिवा आगासन मुख्य जलवाहिनी, बी आर नगर मुख्य जलवाहिनी आणि मुंब्रा देवी कॉलनी मुख्य जलवाहिनी अशा एकूण सुमारे साडेचार किमी लांबीच्या पाईपलाईन वॉश आऊट करण्यात येत आहेत.मागील दोन वर्षात विक्रमी वेळेत या पाईपलाईन टाकण्याचे काम पालिका प्रशासनाने केले आहे.या पाईपलाईन वॉश आउट करून झाल्यावर दिवा वासीयांना नव्या पाईपलाईन वरून पाणीपुरवठा सुरू होणार आहे.दिव्यातील पाणी टंचाई दूर होण्यास यामुळे मदत होणार असल्याचे रमाकांत मढवी यांनी पाहणी दौऱ्या दरम्यान सांगितले.एकूण चौदा वॉश आऊट घेण्यात येणार असून आतापर्यंत ११ वॉश आऊट घेण्यात आले आहेत. संपूर्ण पाईपलाईन स्वच्छ झाल्यानंतर यातून नागरिकांना पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.शुक्रवारी करण्यात आलेल्या पाहणी दौऱ्या दरम्यान माजी उपमहापौर मढवी यांच्यासोबत माजी नगरसेविका दर्शना म्हात्रे,पाणीपुरवठा अधिकारी वाघिरे उपस्थित होते.

### माजी उपमहापौर मढवी व पालिका अधिकारी वाघिरे यांच्याकडून पाहणी

> *दिवा शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा व नागरिकांची पाणी समस्या निकालात निघावी यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून नव्या पाईपलाईन टाकण्यात आल्या. लवकरच शहरातील अनेक भागातील पाणी प्रश्न कायमचा सुटलेला असेल.*
>
> *– रमाकांत मढवी,*
> *माजी उपमहापौर*

# ५ लाख लोकसंख्येच्या दिव्याला पालिकेचे स्वतंत्र रुग्णालय नाही

## भाजपच्या ज्योती पाटील करणार लक्षवेधी धरणे आंदोलन



## १०० बेडचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याची मागणी

**दिवा:– दिव्यात लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत असताना येथील नागरिकांच्या व महिलांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून दिवा शहरासाठी पालिकेचे स्वतंत्र १०० बेडचे रुग्णालय तसेच महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू करण्यात यावे या मागणीसाठी दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील या एकदिवसीय धरणे आंदोलन करणार आहेत.**

## महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालयाचा आग्रह

दिव्यात एकही पालिकेचे सार्वजनिक रुग्णालय नाही. दिव्याला रुग्णालय मिळावे या मागणीसाठी दिवा प्रभाग समिती कार्यालय येथे ज्योती पाटील लक्षवेधी आंदोलन करणार आहेत.

अलीकडेच ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्त यांच्याकडे दिवा शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू करण्याची मागणी केली होती.दिवा शहरातील गर्भवती महिलांना उपचारासाठी ठाणे डोंबिवली या शहरात जावे लागते. खाजगी रुग्णालयाचे दर परवडत नसल्याने सर्वसामान्य महिलांना वेळेत उपचार मिळत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन दिवा शहरासाठी स्वतंत्र महिला रुग्णालय उभारण्यात यावे ही मागणी ज्योती पाटील यांनी केली होती. त्याचबरोबर दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना वेळेत व मोफत उपचार मिळावेत यासाठी दिवा शहरात स्वतंत्र १०० बेडचे रुग्णालय उभारण्यात यावे अशीही मागणी भाजपच्या ज्योती पाटील यांनी केली होती.या मागणीच्या पाठपुराव्यासाठी व प्रशासनाचे लक्ष दिवा शहरातील आरोग्य समस्ये कडे वेधन्यासाठी दिवा प्रभाग समितीच्या कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय ज्योती पाटील यांनी घेतला आहे. १० एप्रिलला सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत ज्योती पाटील पालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन करणार आहेत. दिवा शहरासाठी स्वतंत्र सुसज्ज रुग्णालय पालिकेने सुरू करावे या मागणीसाठी हे आंदोलन असणार असल्याचे ज्योती पाटील यांनी सांगितले आहे.

# रिक्षा चोरल्यावर बनावट नंबर लावून प्रवासी भाड्यासाठी ती वापरणाऱ्या दुकलीला अटक

**ठाणे:** रिक्षा चोरी करून त्या रिक्षावर बनावट नंबरप्लेट लावुन तिचा प्रवासी भाडयासाठी वापर करणाऱ्या महिलेसह एका पुरुष या दुकलीला ठाणे शहर पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने जेरबंद केले. तसेच तो गुन्हा उघडकीस आणून चोरीला गेलेली रिक्षा हस्तगत करण्यातही यश आले आहे. तर त्या दोघांना मानपाडा पोलिसांच्या हवाली करण्यात आल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाने दिली.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत चोरीस गेलेल्या वाहनांसंदर्भात गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांच्या आदेशाने विशेष मोहिम राबवली जात आहे. याचदरम्यान डोंबिवली, मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिक्षा चोरीस गेली ती रिक्षा चोरणाऱ्या इसमाने रिक्षाची मुळ नंबर प्लेट काढुन त्याठिकाणी बनावट नंबर प्लेट लावुन रिक्षाचा वापर करीत असल्याची माहिती पोलीस हवालदार एस एम बाबर यांना मिळाली.

त्यानुसार खंडणी विरोधी पथकाने मानपाडा,खोणी गाव येथील अन्सार उस्मान शेख (३८) याला ताब्यात घेत चौकशी केल्यावर त्याला ती रिक्षा नजमा शेख हिने विकली असल्याची सांगुन रिक्षाची ओळख पटु नये म्हणुन त्याने रिक्षाची मुळ नंबर प्लेट काढुन त्यावर बनावट क्रमांकाची नंबरप्लेट लावुन सदर रिक्षा प्रवासी भाडयाकरीता वापरीत आहे अशी कबुली दिली. तसेच नजमा अब्दुल सलाम शेख (५३) हिला ताब्यात घेतल्यावर तिनेही त्या गुन्हयाची कबुली देत, ती रिक्षा तीने खोणी पलावा येथून चोरल्याचे सांगितले. मुंब्र्यातील नासीर नाजीर खान याने दिलेल्या तक्रारीवरून मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा दाखल असल्याने त्या दोघांना मानपाडा पोलिसांच्या हवाली केले आहे. ही कारवाई खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक पोपट नाळे, पोलीस उपनिरीक्षक विजय राठोड, महेश कवळे, पोलीस हवालदार संजय बाबर, संजय राठोड, योगीराज कानडे, कल्याण ढोकणे, तानाजी पाटील यांनी केली.




## ठाण्याच्या प्रवणचे सलग चौथे राष्ट्रीय विजेतेपद

**ठाणे:** पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात १८ ते २० मार्च दरम्यान पार पडलेल्या २१ वी राष्ट्रीय पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत प्रणव देसाईने १०० मीटरमध्ये सुवर्ण आणि २०० मीटरमध्ये रौप्य पदक मिळवले.

प्रणवने १०० मीटरपेक्षा वेगवान ब्लेड रनर म्हणून आपल्या विजेतेपदाचे यशस्वीपणे रक्षण केले. प्रणवने सलग चौथ्यांदा राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरण्याचे लक्ष्य प्रणवचे असल्याचे त्याचे प्रशिक्षक निलेश पाटकर यांनी सांगितले.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्ताने काढण्यात येणाऱ्या रॅलीबाबत दिवा पोलिसांना निवेदन देण्यात आले. दरवर्षी प्रमाणे सदर मंडळाच्या वतीने दिवा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. शहाजी शेळके यांना निमंत्रण देण्यात आले. सदर निवेदन देण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष एकनाथ भगत, कार्याध्यक्ष आयु. दिनेश पाटील, उपाध्यक्ष मिलिंद गवई, संघटक बालाजी कदम , खजिनदार गंगाधर गायकवाड, सह खजिनदार प्रदीप सकपाळ, बापूसाहेब भोसले, व युवक कार्यकर्ते अमित कासारे ,व राहुल जोगदंड, सुधाकर कांबळे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

## ठाण्यातील अट्टल गुन्हेगार जयप्रकाश बिंद स्थानबध्द

**ठाणे:** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दहशत पसरविणाऱ्या कळव्यातील कुप्रसिध्द गुंड जयप्रकाश प्रल्हाद बिंद ( ४०) याला एमपीडीए कायद्यान्वये २३ मार्चपासून एक वर्षाकरिता पुणे येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याच्याविरोधात कळवा पोलीस ठाण्यात विनयभंग, गंभीर दुखापत, दुखापत, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न धमकावणे, शिवीगाळ करणे, नुकसान करणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे इत्यादी एकूण ६ गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई प्राप्त प्रस्ताव व सहकागदपत्रांची पडताळणी करून पोलीस आयुक्त जय जीत सिंह यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे करण्यात आली आहे. या चालू वर्षातील आतापर्यंत ४ थी कारवाई असून यापुढे देखील दहशत पसरविणारे अट्टल गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई चालु राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**




दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल सुरू करण्यासाठी दिव्यातील सामाजिक कार्यकर्ते अमोल केंद्रे व अश्विनी केंद्रे यांच्या वतीने नुकताच एल्गार मोर्चा काढण्यात आला. दिवा रेल्वे स्थानकातील अनेक समस्या संदर्भात दिवा रेल्वे स्टेशनचे उप स्टेशन मास्तर कमलेश कनोजिया यांना आंदोलन कर्त्यांकडून निवेदन देण्यात आले. दिव्यातील दातवली रोड,विठ्ठल मंदिर ते दिवा स्टेशन पर्यंत सदर मोर्चा काढण्यात आला. दिवा रेल्वे स्थानकाचे उपस्टेशन मास्तर कमलेश कनोजिया यांनी मोर्चे करांना आश्वासन देताना सांगितले की,दिवा येथून लवकरात लोकल सोडवण्यात येणार आहे. दिवा पूर्व रेल्वे तिकीट घर लवकर चालू करण्यात येईल व जलद लोकल थांबवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. रेल्वे प्रशासन इतरही मागण्या लवकर सोडवतील असे आश्वासन मोर्चेकऱ्यांना दिले.दोन महिन्यात या आंदोलनाची दखल घेऊन समस्या न सोडविल्यास छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मध्य रेल्वे प्रबंधक कार्यालय समोर आंदोलन करण्यात येईल असे अमोल धनराज केंद्रे यांनी यावेळी सांगितले.यावेळी रामपाल मोर्या, विद्या जैयस्वाल, प्रियंका सोनवणे, यांच्यासह दिव्यातील अनेक महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजप, शिंदे गट आणि आता मनसे हे तिघे एकत्र अंगावर येत असले तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव त्यांच्यावर भारी!

## उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगांवकर यांचा राज ठाकरे यांच्या टिकेनंतर टोला

**ठाणे:**–भाजप मिंधे गट यांच्यासह राज ठाकरे यांनी ही ही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे नाव विरोधकांना भारी पडत असून हे नाव घेतल्याशिवाय विरोधकांना झोपच लागत नाही असा सणसणीत टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी लगावला आहे.

भाजप मनसे मिंधे गट हे सगळे मिळून अंगावर आले तरी बाळासाहेबांचा वाघ उद्धव ठाकरे हे झुकत नाहीत, झुकणार नाहीत, असे सांगताना संजय घाडीगावकर यांनी राज ठाकरे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. शिवसेनेला सोडून ४० गद्दार निघून गेले ते सत्तेसाठी आणि स्वार्थासाठी निघून गेले.पक्षाचे नाव आणि चिन्ह त्यांनी बळकावले. ज्या शिवसेनेने त्यांना मोठं केलं त्याच शिवसेनेच्या फुटीस ते कारणीभूत ठरले. राज ठाकरे या मिंधे गटाचे समर्थन करताना या फुटीस उद्धव ठाकरे यांना जबाबदार ठरवतात,मात्र राज ठाकरेंना त्यांचे १३ आमदार का सोडून गेले?याचे उत्तर मात्र राज ठाकरे देत नाहीत. गेल्या काही वर्षात मनसे मधून अनेक नेते बाहेर का पडून जातात? याचे उत्तर राज ठाकरे यांनी द्यावं.नारायण राणे शिवसेनेतून बाहेर पडले नसते असं राज ठाकरे म्हणाले. मात्र तेच नारायण राणे काँग्रेसमध्ये गेले.मंत्री झाले आणि काँग्रेसला सोडून निघून गेले. स्वतःचा पक्ष स्थापन करून त्या पक्षातून देखील स्वतः नारायण राणे बाहेर पडले आणि भाजपमध्ये दाखल झाले.मग याला पण उद्धव साहेब जबाबदार आहेत का? अशा राण्यांची बाजू राज ठाकरे घेतात आणि उद्धव साहेबांना कमी लेखण्याचा प्रयत्न करतात. यातूनच यांचे राजकारण लक्षात येते, असा सणसणीत टोला संजय घाडीगावकर यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरे हेच महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रबिंदूस्थानी असून महाराष्ट्रातील जनतेची साथ उद्धव ठाकरेंना आहे,असेही घाडीगावकर यांनी म्हटले आहे.



दिवा मेघवाळ पंचायत विभागाच्या वर्धापन दिनानिमित्त भाजप दिवा महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांच्या कार्यालयात पूर्ण बॉडी स्कॅनिंग, मोफत मेडिकल चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला होता. यावेळी भाजपा दिवा अध्यक्ष रोहिदास मुंडे, ज्योती पाटील, विभाग प्रमुख अशोक सोलंकी, शैलेश राठोड, राजेश भोज, मिनू गोहिल,विनुबेन,पडाया, काताबेन वालेरा,मिनाबेन पटेल तसेच सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्टोव्हचा भडका; महिलेला किरकोळ दुखापत

**ठाणे:** दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरील नवीन ठाणे महानगरपालिका चाळीमधील रुम नंबर ३ मध्ये पुजेकरिता स्टोव्हवरती धूप पेटवत असताना अचानक त्या स्टोव्हचा भडका होऊन आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी बारा ते सव्वा बाराच्या सुमारास घडली. यामध्ये रेश्मा प्रवीण जाधव (४१) या किरकोळ भाजल्या असून त्यांच्या दोन्ही हाताला आणि चेहऱ्याला दुखापत झाली आहे. त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ठाणे नगर पोलिस कर्मचारी, महावितरणचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच लागलेल्या आगीवर आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास अर्ध्या तासात पूर्णपणे नियंत्रण मिळविले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## दिव्यात शिवसेनेची गुढीपाडवा रॅली

शिवसेना दिवा शहराच्या वतीने गुढीपाडव्या निमित्त भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅली मध्ये हजारोच्या संख्येने दिव्यातील तरुणांनी सहभाग घेतला. दिवा चौकापासून ते साबेगांव, दिवा स्टेशन, ते मुंब्रा कॉलनी, दातिवली, , बेतवडे, आगासन फाटक,दिवा चौक दरम्यान ही रॅली संपन्न झाली. या रॅलीत उपमहापौर रमाकांत मढवी मा.नगरसेवक शैलेश पाटील, दीपक जाधव अमर पाटील उपशहर प्रमुख गणेश मुंडे, आदेश भगत, निलेश पाटील, विभाग प्रमुख विनोद मढवी, चरणदास म्हात्रे, भालचंद्र भगत, उमेश भगत, गुरुनाथ पाटील, शशिकांत पाटील, सर्व शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गट प्रमुख, मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २७ मार्च २०२३


# शहिद दिनी हुतात्म्यांना मुख्यमंत्र्यांचे अभिवादन



**ठाणे :** शहिद दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी ठाणे येथील निवासस्थानी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तर

ठाणे महापालिकेच्या वतीने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे शहिद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, उप आयुक्त प्रशांत रोडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तर तहसीलदार (सर्वसाधारण) राजाराम तवटे तसेच महापालिका व जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आदिवासी सांस्कृतिक संग्रहालयाची स्थापना करणार

## –डॉ. विजयकुमार गावित

**मुंबई :** आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी आदिवासी सांस्कृतिक संग्रहालयाची स्थापना करण्यात येणार असून त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी विधानसभेत सांगितले.

यासंदर्भात विधानसभा सदस्य भिमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री गावित म्हणाले की, गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राच्या उभारणीकरिता नागपूर येथील सुराबर्डी येथे पंधरा एकर जागा उपलब्ध करण्यात आली आहे. या जागेमध्ये आदिवासींचे जीवन व कला संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या मौल्यवान व दुर्मिळ वस्तूंचे जागतिक दर्जाचे गोंडवान आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती ही अति प्राचीन असून या संस्कृतीला वेगवेगळ्या रूढी परंपरा लाभल्या आहेत या आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी वेगवेगळे उपाय शासनामार्फत केले जात आहेत.

राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या विविध संस्कृती, वेशभूषा, अलंकार, साहित्याची स्वतंत्र मांडणी करून त्याची जातनिहाय स्वतंत्र दालने उभारुन जागतिक पातळीचे भव्य संग्रहालय तयार करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. गावित यांनी सांगितले. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य आशिष जैस्वाल, सुनील राणे, हिरामण खोसकर,प्राजक्त तनपुरे यांनी सहभाग घेतला होता.

# ‘आनंदाचा शिधा’चे वितरण महिनाभर सुरु राहणार

**मुंबई :** राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा संचाचे वितरण २२ मार्च २०२३ पासून पुढील एक महिनाभर सुरु राहणार आहे, असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा, अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधा पत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणांनिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर खाद्यतेल या ४ शिधा जिन्नसांचा समावेश असलेला आनंदाचा शिधा संच उपलब्ध करुन देण्याचा निर्णय २२ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार काही जिल्ह्यांत वितरण सुरू झाले आहे.

यापूर्वी सन २०२२ मधील दिवाळी सणानिमित्त माहे ऑक्टोबर २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा संचाचे वितरण करण्यात आले होते, असे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# आगरी–कोळी समाजात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार

*__ठाणे:__ चैत्र नवरात्र उत्सवात पहिल्या दिवशी ठाणे, नवी मुंबई, मीराभाईंदर क्षेत्रातील आगरी व कोळी समाजातील उल्लेखनीय काम करणार्या मान्यवरांचा गौरव करून त्यांना सन्मानित करण्यात आले. सत्कार मूर्तींमध्ये ठाण्यातील मानसी दीपक तांडेल, ऋतूवीज किरण कोळी, सुजय सुरेश कोळी, विपिन भगवान कोळी, सुरेन कोळी, जगदीश महादेव भोईर, डॉ. गिरीश साळगावकर, तानाजी हरिचंद्र पाटील, हेमिता मढवी नवी मुंबईतील भानुदास सावळाराम पाटील, शंकर शिमग्या पाटील, गुरुनाथ मोतीराम पाटील भाईंदर, उत्तन येथील मच्छिमार कुटुंबातील सियोना वायाघर, धनश्री रवींद्र पाटील इत्यादी मान्यवरांचा समावेश आहे. त्याचबरोबर संतोष चौधरी प्रस्तुत दादुस आला रे या कोळीगीताचा कार्यक्रम सादर झाला असून या कार्यक्रमाच्या पहिल्याच दिवशी ठाणेकर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत राहून देवीचे दर्शन करून या कोळीगीत कार्यक्रमाचा आनंद घेतला. तसेच या कार्यक्रमासाठी असलेल्या दादुस व त्यांची पत्नी यांना खासदार राजन विचारे यांनी सन्मान चिन्ह सन्मानित केले.*

# शैक्षणिक सहलीनिमित्त अनुदानित वस्तीगृहातील २७ विद्यार्थ्यांची मुंबई ते दिल्ली सफर



**ठाणे:** अग्रीपंख या मोहिमेद्वारे अनुदानित निवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे समाज कल्याण विभाग अंतर्गत १८ ते २१ मार्च दरम्यान आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीनिमित्त निवडक २७ विद्यार्थ्यांची मुंबई ते दिल्ली अशी हवाली सफर झाली आहे. विद्यार्थ्यांना देश प्रेम व राष्ट्र प्रेम जागृत व्हायला हवे या उद्देशाने ही सहल अक्षरधाम, अमृतसर, सुवर्ण मंदिर, जालियनवाला, बाग वाघा बॉर्डर, लालकिल्ला, राष्ट्रपती भवन, संसद भवन, इंडिया गेट, शांतीचं प्रतीक असणारा लोटस मंदिर, राजघाट या स्थळांची निवड करण्यात आली होती.

अग्रीपंख शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परिक्षा घेण्यात आली. ४८१ विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झालेल्या २७ विद्यार्थ्यांची या सहलीसाठी निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना सहलीसाठी विविध वस्तू दिल्या गेल्या त्यामध्ये ड्रायफ्रुटस, कपडे, बॅग, टुटपेस्ट, ब्रश अशा अनेक महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या सहलीचा सर्व खर्च समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहलीचा प्रवास सुकर करण्यासाठी बस व विमानाने प्रवास विद्यार्थ्यांनी केला. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल आयोजित करुन त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मनुज जिंदल व अतिरिक्त कार्यकारी अधिकारी रुपाली सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली अग्रीपंख शैक्षणिक सहल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य मिळाले.

या शैक्षणिक सहलीसाठी समाज कल्याण विभागाचे संजय बागुल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक, महिला डॉक्टर, शिपाई यांच्या सहकार्याने या सहलीत कोणताही व्यत्यय न येता विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वारसा जपत शैक्षणिक सहली यशस्वी झाली.

# आता ठाण्यातही चालणार डबल डेकर बस



- ठामपा आयुक्त
अभिजीत बांगर

**ठाणे :** मुंबईतील रस्त्यांवर दिसणारी डबल डेकर बस लवकरच ठाणे शहरातील रस्त्यांवरून धावताना दिसणार आहे. त्यामुळे ठाणेकर नागरिकांची ठाण्यात डबल डेकर बसमधून प्रवास करण्याची प्रतीक्षा आता येत्या काही दिवसात संपणार आहे. तसेच या बसेस परिवहनच्या ताफ्यात दाखल होणार आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेच्या मार्फत नियोजन केले आहे. असे मंगळवारी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी अर्थसंकल्पाची माहिती देताना सांगितले.

काही दिवसांपूर्वी परिवहन सेवेने परिवहन समितीकडे २०२३ - २४ चा ४८७.६९ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यात परिवहन समितीने ८०.२२ कोटींची सुचवत हा अर्थसंकल्प महापालिकेला सादर केला. यात पालिकेकडून वाढीव अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. ठाणे परिवहन सेवेच्या माध्यमातून उत्पन्न वाढीसाठी प्रवासी संख्येचा विचार करुन नवीन मार्ग सुरु करणे, त्यांचा विस्तार करणे आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यात मुंब्रा ते भिवंडी, मिरारोड वाशी या मार्गावर तसेच माजिवड्यापासून भिवंडी, अप्पर लोढा ते ठाणे स्टेशन असे मार्ग नव्याने सुरु करण्यात आले आहेत. तर उत्पन्न वाढीसाठी परिवनहचे आरक्षित भुखंड, बीओटी किंवा अकोमोडेशन रिझर्वेशन तत्वावर बांधकाम करुन भुखंड व्यापारी संकुल म्हणून विकसित करुन त्याद्वारे परिवहनला भाडे मिळू शकते असेही या अर्थसंकल्पात नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार हे भुखंड विकसित केल्यास परिवहनला पुढील दोन ते तीन वर्षात महापालिकेच्या अनुदानाची गरज भासणार नसल्याचा विश्वास आयुक्त बांगर यांनी व्यक्त केला आहे. तर आता ठाणेकरांना डबल डेकर बस पाहता येणार असून त्यातून प्रवासही करता येणार आहे. येत्या काळात परिवहनच्या ताफ्यात डबल डेकर बस घेण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. या बस किती असतील हे स्पष्ट झाले नसले तरी देखील लांब पल्याच्या मार्गावर त्या धावणार असल्याचे यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले.

# ठाण्यात होते आहे पाण्याची नासाडी



## जल बोगद्याच्या दुरुस्तीला मुहूर्त कधी ठाणे काँग्रेसचा सवाल



**ठाणे: ठाणे जिल्ह्यातून मुंबईला पाणीपुरवठा करणारे पाणी जल बोगद्याद्वारे भांडुप येथील जल शुद्धीकरण प्रकल्पात नेले जाते मात्र याच जलशुद्धीकरणासाठी पाणी वाहून नेणाऱ्या भूमिगत जल बोगद्याला ठाणे शहरातील किसन नगर भागात बोअरवेल साठीचे खोदकाम करताना नोव्हेंबर महिन्यात हानी झालेली आहे. मागील पाच महिन्यांपासून या ठिकाणी दररोज अंदाजे पाच ते सहा दशलक्ष लिटर पाणी वाया जात आहे. वाया जाणारे पाणी पटकन निदर्शनास येणार नाही अशा पद्धतीने सक्शन पंप द्वारे गटारात व नाल्यात सोडलेले जात असल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी करत, नोव्हेंबर महिन्यात जल बोगद्याला हानी पोहोचल्यापासून आतापर्यंत लाखो रुपयांचे पाणी विकासकाने केलेल्या हलगर्जीपणामुळे नाले व गटारात वाहून गेलेले आहे. असे म्हटले आहे.**

२० जाने २०२३ पासून हा जलबोगदा दुरुस्तीसाठी बंद करावा लागणार आणि पुढील सूचना मिळेपर्यंत प्रक्रियेशिवाय पाणी पुरवठा होणार त्यामुळे नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत कृपया पाणी उकळून प्यावे असे आवाहन मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले. मात्र अद्यापपर्यंत ते काम झालेले नाही. वास्तविक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल विभागाने जलबोगद्याच्या दुरुस्तीचे काम आतापर्यंत पूर्ण करायला पाहिजे होते. परंतु पाच महिने होऊन देखील परिस्थिती जैसे थे अशी आहे. ही बाब काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी पत्राद्वारे जल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

काही वर्षांपूर्वी वागळे इस्टेट,किसन नगर भागात पाईपलाईन फुटून महापूर आला होता वागळे इस्टेटचा बहुतांश भाग त्यावेळी जलमय झाला होता व याचा फटका अंदाजे दहा ते पंधरा हजार रहिवाशांना बसला होता. जर या ठिकाणी जल बोगद्याला जास्त प्रमाणात हानी पोहोचली असती तर मागील वेळेपेक्षा मोठ्या प्रमाणात पूरपरिस्थिती निर्माण होऊन जीवितहानी आणि वित्तहानी झाली असती. मुख्य भूमिगत जल बोगदा जर कोणत्याही प्रकारे काम करताना फुटला गेला तर संबंधित कंपनी अथवा प्राधिकरणाला दुरुस्तीचा खर्च,पर्यायी व्यवस्थेचा खर्च,वाहून गेलेल्या पाण्याच्या किंमतीचा खर्च या दोघांची एकूण रक्कम अधिक ४०० टक्के दंड आकारला जाणार हा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे समजते. परंतु या ठिकाणी कुठलीही परवानगी नसताना बोअरिंग साठी खोदकाम करत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूमिगत जल बोगद्याला हानी पोहोचविल्याबद्दल संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल व्हायला पाहिजे होता. परंतु चार महिने उलटूनही अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. असेही त्या निवेदनात म्हटले. तर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत राहुल पिंगळे यांनी विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की या ठिकाणी एमआयडीसीला बांधकाम परवानगी दिली आहे व घटना घडल्यावर आम्ही लगेच त्यांच्याशी पत्र व्यवहार केला आहे. पण यासाठी कोणते कलम लावायचे हे स्पष्ट होत नसल्याचे स्पष्ट केले असेही पिंगळे यांनी सांगितले.

# महाड तालुक्यातील सिंचन व जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार

**मुंबई :** महाड तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या सिंचन व जलविद्युत प्रकल्पांमुळे बाधित गावकऱ्यांच्या पुनर्वसनाला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले. यामुळे तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.



तालुक्यातील विविध सिंचन व जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणींसंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात बैठक झाली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आमदार भरत गोगावले, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, विभागीय आयुक्त डॉ. महेद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी योगेश म्हसे, कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता मिलींद नाईक, काळ विद्युत प्रकल्प कमिटीचे अध्यक्ष दीपक कोतेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या जाणून घेतल्या. ते म्हणाले, महाड तालुक्यातील सिंचन व जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही वेगाने झाली पाहिजे. प्रकल्पबाधितांना न्याय मिळाला पाहिजे ही राज्य शासनाची भूमिका आहे. कोथेरी प्रकल्पाचे काम ऑक्टोबरमध्ये सुरू करावे. शिरगाव येथील प्रकल्पग्रस्तांना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान मंजूर करण्याचे, निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी प्रशासनाला यावेळी दिले.

महाड तालुक्यातील नागेश्वरी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. या अहवालास येत्या दोन महिन्यांत मान्यता देण्यात येईल. या प्रकल्पातील भूसंपादनाचा मोबदला तातडीने जमा करावा आणि धरणाचे काम सुरु करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

काळवली- धारवली योजना या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून तपासून शासनास सादर करावा. तसेच सांभरकुंड प्रकल्पाची वन जमीन मान्यता केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे. त्याचा पाठपुरावा करावा. जमिनीच्या वाढीव सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी प्रशासनाला यावेळी दिले.

सिंचन व जलविद्युत प्रकल्पांना लागणारी जमीन देण्यास तयार आहेत. पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावून धरणाचे काम सुरु करावे. पुनर्वसनाच्या क्षेत्रात सर्व सोयीसुविधा असाव्यात. प्रकल्पबाधितांना प्रधानमंत्री आवास योजना किंवा राज्य शासनाच्या घरकुल योजनेतून घरे मिळावीत अशा विविध मागण्या समितीने केल्या होत्या. यावर राज्य शासन कार्यवाही करेल, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी प्रकल्पबाधितांना आश्वस्त

## अलिबाग-रोहा रस्त्याचे काम वेळेत पूर्ण करणार

### सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण

**मुंबई :** अलिबाग-रोहा दरम्यान रस्त्याचे काम गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू केलेले आहे. या कामासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या दिलेल्या आहेत. तसेच या रस्त्याचे काम पूर्ण होण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे, असे उत्तर सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधान परिषदेत दिले.

अलिबाग-रोहा रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदार कंपनीने गैर व्यवहार केल्याबद्दल तारांकित प्रश्न विधान परिषद सदस्य जयंत पाटील यांनी उपस्थित केला होता.

मंत्री चव्हाण म्हणाले की, अलिबाग - रोहा रस्ता पूर्ण करण्यासाठी निधीची उपलब्धता आहे. यासाठी शासनाकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या देखील घेतल्या आहेत. लोकहिताच्या कामांमध्ये कोणाकडून अडथळा आणल्यास त्याच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले.

या प्रश्नाच्या अनुषंगाने विधान परिषद सदस्य सर्वश्री कपिल पाटील, अनिकेत तटकरे, प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे यांनी उपप्रश्न विचारले.



## पनवेल बस आगाराच्या नूतनीकरणास विलंब करणाऱ्याकंपनीला कारणे दाखवा नोटीस -मंत्री दादाजी भुसे

**पनवेल :** पनवेल बस आगाराच्या नूतनीकरणास विलंब करणाऱ्या कंपनीला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून नोटीसाचे उत्तर आल्यानंतर कराराच्या अटी व शर्तीप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती, मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

यासंदर्भात विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री भुसे म्हणाले, पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणास काही काळ कोरोनामुळे विलंब झाला आहे. हे काम ज्या कंपनीला देण्यात आले आहे, त्या कंपनीची बाजू ऐकून घेवून जर कारण योग्य असेल तर त्या कंपनीस काम तत्काळ सुरू करण्यास सांगितले जाईल. जर कारण योग्य नसेल तर त्यांना देण्यात आलेले काम रद्द करण्यात येईल आणि नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल, असे सांगून प्रवाशांच्या सोयीसुविधांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भातील चर्चेत विधानसभा सदस्य प्राजक्त तनपुरे यांनी सहभाग घेतला होता.

## दिवा- रत्नागिरी पॅसेंजर ट्रेनच्या वेळेत बदल



**ठाणे :** मध्य रेल्वे ट्रेन क्रमांक ५०१०३ दिवा - रत्नागरी पॅसेंजरच्या वेळा दि. १५.३.२०२३ पासून बदलणार आहे. नवीन वेळा पुढीलप्रमाणे असतील. गाडी क्रमांक ५०१०३ दिवा जंक्शन येथून १५.२० ऐवजी १७.५० वाजता सुटेल आणि रोहा येथे त्याच दिवशी १७.२५ ऐवजी २०.०७ वाजता पोहोचेल. मार्गावरील स्थानकांच्या नवीन वेळा खालीलप्रमाणे असतील; पनवेल - १८.३० वाजता, आपटा - १८.५५ वाजता, जिते - १९.०८ वाजता, पेण - १९.१९ वाजता, कासू - १९.३० वाजता आणि नागोठणे - १९.४३ वाजता. प्रवाशांनी कृपया याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा छढएड प डाउनलोड करा.

# ठाणे झेडपीचा ९२.८९ कोटींचा अर्थसंकल्प सादर

## विविध नाविन्यपूर्ण योजनेचा समावेश

**ठाणे: ठाणे जिल्हा परिषदेचा (झेडपी) विविध नाविन्यपूर्ण योजनेचा समावेश असणारा २०२३-२४ चा ९२.८९ कोटी इतका मूळ अर्थसंकल्प झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मनुज जिंदल यांनी गुरुवारी सादर केला. तर ठाणे जिल्ह्यातील विशेषत: ग्रामीण भागांतील सामाजिक परिस्थिती व तेथे असणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांची आवश्यकता लक्षात घेऊन नव्या योजना सादर करण्यात येणार आहे. Brick to Ink योजना, पहिल्यांदा प्लास्टिक कचरा व्यवस्थापन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल तसेच महिला बचत गटांसाठी किचन कॅफे योजना अशा नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहे असेही मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जिंदल यांनी सांगितले.**



ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात सादर केलेल्या अर्थसंकल्पाच्या वेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मनुज जिंदल यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रुपाली सातपुते, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मयुर हिंगोणे, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. तर या मुळ अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायत विभागासाठी २२.३० कोटी, शिक्षण विभागासाठी ९.३० कोटी, इमारत व दळणवळण विभागासाठी १८.६५ कोटी, सार्वजनिक आरोग्य विभागासाठी ४.४७ कोटी, लघुपाटबंधारे विभागासाठी ४ कोटी, कृषी विभागासाठी २.६० कोटी, पशुसंवर्धन विभागासाठी २.६४ कोटी, दिव्यांग कल्याण विभागासाठी ३.२८ कोटी, समाजकल्याण विभागासाठी ५.८७ कोटी, महिला व बाल कल्याण विभागासाठी ६.९० कोटी, सामान्य प्रशासन विभागासाठी ५.४६ कोटी, वित्त विभागासाठी २.८७ कोटी, पाणीपुरवठा विभागासाठी ४.७५ कोटी चा निधी प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन १.५० कोटी, जिल्हा परिषद शाळांमध्ये स्मार्ट ग्रंथालयांसाठी ६० लाख, Brick to ink / Super ५० योजनेसाठी ५० लाख, शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीसाठी e cart पुरविण्यासाठी २० लाख, कृषी पर्यटन विकासात चालना देण्यासाठी १० लाख, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रसाठी १ कोटी, दिव्यांग व्यक्तींच्या सर्व्हेक्षण/ पुनर्वसनासाठी ३० लाख, समाजमंदिरांमध्ये ग्रंथालय-पुस्तक पुरवठा व सुशोभीकरण ७० लाख, जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता समूह / ग्रामसंघासाठी किचन कॅफे योजनेसाठी ७५ लाख, कुपोषण निर्मूलनासाठी खखढ मुंबईच्या मार्फत अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षणासाठी २५ लाख, स्वच्छ सुंदर कार्यालय स्पर्धेसाठी १० लाख, दिव्यांग रजिस्टर सिस्टीमसाठी ५ लाख, योजना भौतिक प्रगती-वित्तीय प्रगती ट्रॅकिंग डॅशबोर्ड योजनेसाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागासाठी ४.७७ कोटी, शिक्षण विभागासाठी १२.२६ कोटी, आरोग्य विभागासाठी २.५० कोटी, कृषी विभागासाठी २.४० कोटी, लघुपाटबंधारे विभागासाठी २.२३ कोटी, इमारत व दळणवळण विभागासाठी १८.८० कोटी, समाजकल्याण विभागासाठी ४.१२ कोटी, पशुसंवर्धन विभागासाठी २.४८ कोटी, पाणीपुरवठा विभागासाठी ३.८० कोटी, वित्त विभागासाठी २.०३ कोटी, ग्रामपंचायत विभागासाठी २३ कोटी, दिव्यांग कल्याण विभागासाठी २.०९ कोटी, महिला व बाल कल्याण विभागासाठी ४ कोटी इतक्या भरीव निधीची तरतूद केली आहे.

# आधार प्रमाणीकरण करताना बोटांचे ठसे पुसट येत असल्यास लाभार्थींना कार्ड नॉमिनी सुविधा

**मुंबई :** अनेक वृद्ध व्यक्तींच्या बोटांचे ठसे पुसट येत असल्याने आधार प्रमाणीकरण करताना समस्या निर्माण होतात. आता अशा लाभार्थींसाठी 'कार्ड नॉमिनी' सुविधा २९ डिसेंबर २०२० पासून उपलब्ध करुन देण्यात आल्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

विधानसभा सदस्य कॅप्टन आर. तमील सेल्वन यांनी रेशन वाटपाबाबतच्या धोरणात बदल करण्याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री चव्हाण म्हणाले की, १४ हजार २८२ लोकांनी आतापर्यंत




कार्ड नॉमिनी सुविधेचा लाभ घेतला आहे. येणाऱ्या काळात बोटांचे ठसे न मिळाल्यास नवीन तंत्रज्ञान वापरुन लाभार्थींचे 'आय इम्प्रेंशन' करुन त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ कसा मिळेल, यासाठी अभ्यास करण्यात येत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरण प्रकल्पाअंतर्गत रास्त भाव दुकानातील शिधा वितरण करताना लाभार्थींची बायोमेट्रिक ओळख झाल्यांनतर शिध्याचे वितरण होते. जानेवारी २०२३ च्या अन्नधान्याचे वितरण करण्यात आले असून फेब्रुवारी २०२३ मधील अन्नधान्याचे वाटप सुरु आहे. एखाद्यावेळेस तांत्रिक अडचणीमुळे लाभार्थींला अन्नधान्य न मिळाल्यास त्या महिन्याचे अन्न ई-पॉस मशीनमध्ये कॅरी फॉरवर्ड होऊन त्या लाभार्थ्यांला पुढील महिन्यात मिळते. सलग ३ महिने शिधापत्रिकेवर अन्नधान्य न घेतल्यास लाभार्थींचे अन्नधान्य बंद करण्यात येत नसल्याचे मंत्री चव्हाण म्हणाले.

# अनधिकृत बांधकामाबाबत तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्यात येणार - मंत्री उदय सामंत

**मुंबई :** राज्यातील शहरांमध्ये होणाऱ्या अनधिकृत बांधकामाची तक्रार केलेल्या व्यक्तीचे नाव हे कायमस्वरूपी गुप्त ठेवले पाहिजे असे निर्देश महानगरपालिकेला दिले जातील असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितले.

यासंदर्भात विधानसभा सदस्य समाधान अवताडे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री सामंत म्हणाले, मुंबईतील अनाधिकृत बांधकामाबाबत मुंबई शहर व उपनगराचे पालकमंत्री विस्तारित लवकरच बैठक आयोजित करतील. ड्रोन आणि सॅटेलाईटद्वारे नजर ठेवण्यासाठी सकारात्मक विचार करण्यात येईल. संगणकाद्वारे आलेल्या काही तक्रारी येत आहेत.

यापुढे त्या एका वार्डमध्ये जरी आल्या किंवा बाकीच्या शहराच्या तक्रारी आल्या तर त्याच्यावर कार्यवाही करण्याची यंत्रणा देखील तयार करावी अशा सूचना महानगरपालिकेला दिल्या जातील असेही मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य जयंत पाटील, योगेश सागर यांनी सहभाग घेतला होता.




# १ एप्रिलपासून टोलचे दर वाढणार

**नवी दिल्ली : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावरील टोलचे दर वाढवण्याची तयारी सुरु केली आहे. येत्या १ एप्रिलपासून गुरुग्राममधून जाणारा हायवे आणि एक्स्प्रेस वेववरून प्रवास करणे महागणार आहे. दिल्ली-जयपूर हायवेचा खेरकी दौला टोल प्लाझा, गुडगाव-सोहना रोडवरील घमदोज टोल प्लाझा ओलांडण्यासाठी ५ ते १० टक्के जास्त टोल टॅक्स भरावा लागणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.**

याशिवाय दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वेवरील टोल दरात ३ ते ६ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. मार्चच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून या प्रस्तावांवर विचार केला जाईल. परस्पर वाटाघाटीच्या आधारेच टोलचे नवीन दर मंजूर केले जातील. खेरकिडोला टोल प्लाझावर एकेरी जाण्यासाठी ८० रुपये टोल भरावा लागतो. या टोलवर रिटर्न स्लिप सिस्टीम नाही, त्यामुळे तुम्हाला त्या बदल्यात ८० रुपये देखील द्यावे लागतील.

अशाप्रकारे कार चालकाला प्रवासासाठी टोलवर १६० रुपये द्यावे लागतात. आगामी काळात टोल ८० रुपयांवरून ८५ रुपयांपर्यंत वाढवण्याची योजना आहे. तुम्हाला १६० ऐवजी १७० रुपये द्यावे लागतील. खेरकिदौला टोलनाक्यावरून दररोज ६० ते ७० हजार वाहनांची ये-जा असते. या बदलानंतर या टोलवरून

जाणाऱ्यांचा प्रवास १० रुपयांनी महाग होईल.

दिल्ली-मुंबई महामार्गाचे उद्घाटन होऊन एक महिन्याहून अधिक वेळ झाला. यावर प्रति किमी २.१९ रुपये टोल टॅक्स आकारला जातो. नव्या आर्थिक वर्षापासून म्हणजेच १ एप्रिलपासून टोल दरात वाढ होण्याची शक्यता आहे. टोलचे दर ३ ते ५ टक्क्यांनी वाढू शकतात असा दावा करण्यात येत आहे. या संदर्भात ३० किंवा ३१ मार्चला नोटीफीकेसन निघू शकते.

# कोणत्याही शासकीय शाळेतील वीजपुरवठा खंडित होणार नाही

## -शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर




**मुंबई :** शासकीय शाळांमधील वीजदेयके न भरल्याने वीज पुरवठा खंडित होणे ही बाब दुर्दैवी आहे. या पुढे कोणत्याही शासकीय शाळेतील वीज पुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी राज्य शासनामार्फत घेण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

विधानसभा सदस्य सुनील राणे, संजय सावकारे, अशोक चव्हाण, ड.आशिष शेलार, दिलीप वळसे- पाटील आणि विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी राज्यातील सर्व शासकीय शाळांमधील वीज पुरवठा याबाबतचा प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला होता.

केसरकर म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत शाळांमधील वीज पुरवठा खंडित होणार नाही ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळेच वीज पुरवठा खंडित झाल्यावर तातडीने वीज मंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांशी बोलणे करुन यापुढे असे होणार नाही याची काळजी घेण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. थकित वीज देयकांसाठी प्राथमिक शाळांसह सार्वजनिक बाबींचा विद्युत पुरवठा खंडित करु नये, यासाठी मंत्रीमंडळ बैठकीत चर्चा करुन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येईल.शाळांना पुरविण्यात येणाऱ्या विजेसाठी घरगुती वीज दरापेक्षा कमी दर लावला जातो. सध्या सर्व शासकीय शाळांमधील जाने. २३ पर्यंतची वीज देयके अदा करण्यात आली आहेत. येणाऱ्या काळात सौरऊर्जे वर शाळा सुरु करण्यावर शासनामार्फत भर देण्यात येणार आहे. . त्यामुळे थकीत वीज देयकांसाठी, अशा सार्वजनिक बाबींचा विद्युतपुरवठा खंडित करण्यात येणार नाही याची काळजी घेण्यात येईल. तसेच येत्या काही दिवसात या विषयाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे केसरकर यांनी सांगितले.

